## राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्र.-रानिआ-२०२५/प्र.क्र.५४/का-२
नवीन प्रशासन भवन,मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई -४०० ०३२.
दूरध्वनी क्र :- २२८७६२२६
ई-मेल - sec.estt@mah.gov.in
sec.mh@gov.in

दिनांक :- १३ मे, २०२५.

प्रति,
सह /उप सचिव (आस्थापना)
सर्व मंत्रालयीन विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

विषय :- राज्य निवडणूक आयोग कार्यालयातील रिक्त पदे प्रतिनियुक्तीने भरण्याबाबत...

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यालयातील **कक्ष अधिकारी, सहायक कक्ष अधिकारी, निम्नश्रेणी लघुलेखक, अनुवादक, सांख्यिकी सहायक, लिपिक-टंकलेखक** यांची रिक्त पदे मंत्रालयीन विभागातून प्रतिनियुक्ती भरण्याकरिता संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्याकडून इच्छुकता मागविण्यात येत आहे.

२. सर्व मंत्रालयीन विभागांना विनंती करण्यात येते की, सदरहू पत्र विभागातील सर्व संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून प्रस्तुत पदावर आयोगाच्या कार्यालयात प्रतिनियुक्तीने येण्याकरिता इच्छुकता त्यांना संबंधित विभाग कार्यमुक्त करेल किंवा कसे याबाबतच्या अभिप्रायांसह पुढील तक्त्यातील माहिती विभागाच्या सचिवांच्या मान्यतेने या विभागास दिनांक १६ जून, २०२५ पर्यंत थेट आस्थापनेस प्राप्त होतील अशा रितीने कृपया पाठवावी.

| | | |
|---|---|---|
| १. | अधिकारी/कर्मचारी यांचे संपूर्ण नाव | |
| २. | पदनाम | |
| ३. | प्रथम नियुक्तीचे पद व दिनांक | |
| ४. | सध्याचे पद व पदावरील नियुक्तीचा दिनांक | |
| ५. | जन्मदिनांक | |
| ६. | शैक्षणिक अर्हता | |
| ७. | भ्रमणध्वनी क्रमांक | |
| ८. | मागील ३ वर्षाच्या गोपनीय अहवालाच्या छायाप्रती (मूळ गोपनीय अहवाल पाठवू नयेत) | |
| ९. | मत्ता व दायित्व सादर केली आहेत का? (दि. ३१.०३.२०२५ रोजीचे) | |
| १०. | ५०/५५ व्या वर्षी पुनर्विलोकन केले आहे का? (लागू असल्यास) | |
| ११. | संबंधित कर्मचाऱ्याला यापूर्वी प्रतिनियुक्ती दिली असल्यास तपशील (पद, ठिकाण व कालावधी) | |
| १२. | संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द विभागीय चौकशी सुरु अथवा प्रस्तावित आहे का? | |

आदेशानुसार,

आपला,

( के. सुर्यकृष्णमूर्ती )
उप सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत:-

सहायक आयुक्त (माहिती व जनसंपर्क), राज्य निवडणूक आयोग, मुंबई

त्यांना कळविण्यात येते की, त्यांनी उपरोक्त पदभरती करण्यासाठी मंत्रालयाच्या इंट्रानेटवर जाहिरातीद्वारे प्रसारित करण्यात यावे.